# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION
**SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS**
**SENIOR SECONDARY| CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL**
**PRE BOARD-2 EXAMINATION 2024-25**
**MARATHI**

Class : X — Duration : **3** Hrs
Date : 18.12.2024 — Max. Marks : **80**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**
(1) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.
(2) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## विभाग (अ) वाचन व आकलन गुण (15)

**प्र 1 :– (आकलन ) अः अपठित गद्यांश :–**

शहराच्या बाजूला एक जंगल होते. त्या जंगलात असंख्य झाडे होती. जमिनीशी मुळे घट्ट ठेवत आकाशाकडे झेपावणा–या फांदया रूप दाखवत होत्या. पाऊस म्हणजे बरहाचा महिना! वेली,फुले,फांदया,आनंदसोहळा,साजरा करायची.असंख्य पक्षी आपला आनंद सोहळा साजरा करत. पक्ष्यांचे सुश्राव्य संगीत तेथे ऐकायला मिळे. जंगलात अनेक प्राणी होते पण मानवी वस्तीत ते येत नसत.शहराच्या रस्त्यावरून फिरणा–या लोकांना हे जंगल कितीतरी ऊर्जा देत होते. हे जंगल या शहराचे वैभव,सौदर्य होते. अनमोल संपत्ती होती. संध्याकाळी मंद वा–यावर अनेक फुलांचा सुगंध रस्त्यावरील लोकांना वेड लावत होता . आजी आपल्या नातवंडास झाडावर किलबिलणारी पाखरे दाखवत होती. तर कधी झाडावरील कै–या पाहून नातू टाळया वाजवत होता त्याचा आनंद ओसंडून वाहत होता. शहरी माणसे मोठी हुशार व लबाड या जंगलाच्या सौंदर्यांचा मोह पाडत.आजूबाजूच्या जागांच्या किमती गगनाला भिडल्या होत्या या जंगलाभोवती माणसाच्या घरटयांनी गर्दी केली होती.
पण एक दिवस काय झाले? काही सुशिक्षितांच्या डोक्यात आपल्या स्वार्थाच्या कल्पना आल्या आणि ही कल्पना सत्यात उतरवायला काही क्रूर हात समोर आले एका रात्रीत दोनशे झाडांची कत्तल झाली. झोपेतून जाग्या झालेल्या माणसांना सांगण्यात आले आता तुमच्यासाठी जंगलातून एक रस्ता तयार होणार आहे. आता मुख्य रस्त्यापर्यंत आपल्याला एक तास नाही तर फक्त पंधरा मिनिटं लागणार आहेत. आपला प्रवास सुखाचा होणार आहे.मित्रांनो आता जंगल नावाला राहिले आहे. आता आजीबरोबर नातू येथे येत नाही.अनेक उध्वस्त घरटी आणि पाखरांचा आक्रोश येथे मन हेलावून टाकतो .आजूबाजूच्या घरटयातली माणसे आता मूक झाली आहेत. कारण त्यांच्याच माणसांनी सुख वाटता–वाटता त्यांचे खरे सुख हिरावले आहे.सुशिक्षित माणसाच्या सुखाच्या कल्पना माणसाला आणि पुढच्या पिढीला कोठे नेणार आहेत? माणसे का अशी सुखाची व्याख्या बदलतात?

**प्र 1 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा (कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 जंगलातील झाडांच्या फांदया कशा होत्या?
अ जमिनीकडे झुकलेल्या — ब आकाशाकडे झेपावणा–या
क वा–यावर डोलणा–या — ड हिरव्यागार आणि उंच

2 जंगलात पक्ष्यांचे कसे संगीत ऐकायला मिळे?
अ गोड — ब सुश्राव्य — क मधुर — ड आनंदित

3 शहरातून फिरणा–या लोकांना ज्रंगल काय देत असे?
अ ऊर्जा — ब शांतता — क संपत्ती — ड पाऊस

4 कुठल्या गोष्टी मन हेलावून टाकतात ?
अ माणसाची हुशारी व लबाडी — ब माणसाच्या स्वार्थाच्या कल्पना

क उध्वस्त घरटी आणि पाखरांचा आक्रोश  ड माणसाच्या सुखाच्या कल्पना

**प्र 1 (ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन) (3X1=3)**

1 जंगलात कोण आनंद सोहळा साजरा करत असत?

2 जंगलातील प्राण्यांनी कोणता नियम पाळला होता ?

3 रस्त्यावरील लोंकांना कशाचे वेड लागे ?

4 उता–यात शहरी माणसाचा उल्लेख कसा केला आहे ?

**प्र 1(क) उता–याच्या आधारे खालील प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा :–(कोणताही एक) (1X2=2)**

1 एकदा जंगलात काय झाले ?

2 माणसाच्या सुखाच्या कल्पना बदलल्यामुळे काय झाले ?

**प्र 2:– (आकलन ) अः– अपठित पद्यांश :–**

असे जगावे दुनियेमध्ये, आव्हानाचे लावून अत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला दयावे उत्तर....
नको गुलामी नक्षत्रांची, भीती आंधळी ता–यांची
आयुष्याला भिडतानाही, चैन करावी स्वप्नांची
असे दांडगी इच्छा ज्याची, मार्ग तयाला मिळती सत्तर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला दयावे उत्तर....
पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेताना,
हसू असावे ओठांवरती, काळीज काढून देताना.....
संकटासही ठणकावून सांगावे, आता ये बेहत्तर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला दयावे उत्तर....
करून जावे असे काही ,दुनियेतुनी जाताना
गहिवर यावा जगास सा–या, निरोप शेवटचा देताना.....
स्वर कठोर त्या काळाचाही, क्षणभर व्हावा कातर कातर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला दयावे उत्तर....

**प्र 2 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा :– (कोणतेही तीन) (3X1=3)**

1 कवी कोणाला उत्तर दयायला सांगत आहे ?

**अ आव्हानांना  ब आयुष्याला  क संकटांना  ड काळाला**

2 जग,विश्व या अर्थाचा कवितेत आलेला शब्द कोणता ?

**अ दुनिया  ब आयुष्य  ग काळ  घ अंबर**

3 कवेत अंबर घेताना पाय जमिनीवर असावेत या ओळीचा कवीला अभिप्रेत अर्थ –

**अ जास्त उंचावर उडू नये.  ब यश,पैसा,प्रसिध्दी मिळाली तरी गर्व करू नये.**

**ग एका वेळी एकच गोष्ट साध्य होते.  ड वरील पैकी कोणतेही नाही.**

4 ठणकावून सांगणे या वाक्प्रचाराचा अर्थ काय ?

**अ ओरडून सांगणे  ब जोरात बोलणे**

**ग बजावून सांगणे  ड स्पष्टपणे बोलणे**

**प्र 2 (ब) एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन) (3X1=3)**

1 कवीच्या मते आयुष्याला कशाचे अत्तर लावावे?

2 सत्तर मार्ग कोणाला मिळतील ?

3 दुनियेतून जाताना कवी काय करायला सांगत आहे ?

4 कवितेतून कोणती शिकवण मिळते ?

**विभाग :– ब ( 20 गुण)**

**प्र 3 (अ) शब्दांच्या जाती ओळखा :– (कोणतेही चार) (4X1=4)**

1 मुलांनो,परीक्षा जवळ आली भरपूर अभ्यास करा.

अ सर्वनाम  ब विशेषण  क नाम  ड अलंकार

2 आई बाजारात गेली आणि तिने भाजी आणली. ( उभयान्वी अव्यय ओळखा)
अ आई ब बाजार क भाजी ड आणि
3 झाडावर अनेक रंगीबेंरंगी पक्षी आहेत. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)
अ क्रियाविशेषण अव्यय ब विशेषण क शब्दयोगी अव्यय ड सर्वनाम
4 बापरे! काय भयानक हा अपघात.. ( केवलप्रयोगी अव्यय ओळखा)
अ अपघात ब बापरे क हा ड काय
5 संगीता,नीता दोघीही गावाला गेल्या .( आधोरेखित शब्दाची जात ओळखा)
अ विशेषण ब क्रियापद क क्रियाविशेषण अव्यय ड नाम

**प्र 3 (ब) काळ ओळखा व बदला ( कोणतेही तीन) (3X1=3)**

1 सुट्टीत मी शिबिराला जाईल.( काळ ओळखा).
2 बाहेर मुसळधार पाऊस पडता आहे. (भूतकाळातील वाक्य तयार करा)
3 परीक्षा जवळ आली की मनात धाकधूक होते. ( भविष्यकालिन वाक्य तयार करा )
4 प्रयत्नांच्या बळावर शिखर सर करता येते.(काळ ओळखा)

**प्र 3 (क) वाक्याचे प्रकार ओळखा ( कोणतेही तीन) (3X1=3)**

1 देवाच्या दर्शनासाठी भक्तांनी संयम ठेवू नये का ? ( विधानार्थी वाक्य बनवा)
2 त्या दिवशी राधा हजर होती.. ( नकारार्थी वाक्य करा )
3 छे! मी कधीच असे बोललो नाही.
4 मुलानों सभागृहात शांतता राखा.

**प्र 3 (ड) समानार्थी शब्द ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 वाघ = (अ व्याघ्र ब सिंह क चित्ता ड कोल्हा)
2 ओढा = ( अ नदी ब तलाव क नाला ड समुद्र )
3 तुष्टी= ( अ वृष्टी ब दृष्टी क तृप्ती ड वृत्ती )

**प्र 4 (अ) विरुध्दार्थी शब्द ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 दाट ( अ गर्द ब दाटी क विरळ ड विरल )
2 मरगळ ( अ आनंद ब हर्ष क उत्साह ड खुश )
3 सुरुवात ( अ शेवट ब मोठा क आरंभ ड संथ )

**प्र 4 (ब) लिंग बदला ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 पती (अ बायको ब भार्या क पत्नी ड बाई )
2 वृद्ध ( अ म्हतारा ब वृद्धा क व्रदधा ड वृधा )
3 मित्र ( अ मेत्रीन ब मैत्रिण क मैत्रीण ड मैत्रीन )

**प्र 4(क) वचन बदला ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 गोष्ट ( अ कथा ब गोठया क गोष्टी ड गोष्टि )
2 कल्पना ( अ कल्पनी ब कल्पात क कल्पना ड कल्प )
3 रान ( अ राण ब राने क रान ड राणे )

**प्र 4 (ड) समास ओळखा ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 बाजारहाट ( अ दवंद्व ब अव्ययीभाव क व्दिगु ड समाहार व्दंद)
2 बारभाई ( अ इतरेतर व्दंद ब वैकल्पिक व्दंद क व्दिगु ड अव्ययीभाव )
3 गल्लोगल्ली ( अ अव्ययीभाव ब व्दंद क व्दिगु ड इतरेतर व्दंद )

**विभाग–क पाठयपुस्तक आधारित (30 गुण)**

**प्र 5 (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन) (3X1=3)**

1 अब्दुलला कोणती कला साधली होती ?
2 भावे सरांच्या प्रयोगावरून लेखकाला कोणत्या गोष्टी कळल्या ?
3 बसून–बसून काय खेळल्याने वनज वाढते?

4 पु.ल.व सुनीताबाईंनी दिलेल्या शालीचा लेखकाने पाठात केलेला उल्लेख काय आहे?

**प्र 5 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा (कोणतेही तीन) (3X1=3)**

1 भावे सर आम्हांला ------- शिकवीत.
2 आमच्या कोकणात सर्वच ----- खातात.
3 लेखकांच्या हायस्कूलमध्ये दर शनिवारी ------ परीक्षा घेण्यात येत असे.
4 कथेची आकर्षक सुरूवात आणि -------शेवट ही वैशिष्टये आहेत.

**प्र 5 कः– खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहाः– (1X3=3)**

1 भावे सरांचे शब्द हीच खरी माशेलकरांची ऊर्जा या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.
2 शन्नूच्या वागण्यामागील तिचा विचार काय असावा,या विषयी तुमचे मत लिहा.
3 पंतांच्या उपासाबाबत त्यांच्या पत्नीचा अवर्णनीय उत्साह तुमच्या शब्दात वर्णन करा.

**प्र 5 ङः– वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्य पुन्हा लिहा :– (5X1=5)**

**<u>(कीव येणे /सुरुंग लावणे/ गलका करणे /हातभार लावणे/ अधःपतन होणे )</u>**

1 मदारी येताच मुलांनी त्याच्याभोवती आवाजाचा एकच गोंधळ केला.
2 श्रमदानासाठी सर्व विदयार्थ्यांनी शिक्षकांना मदत केली.
3 वाटेवर झोपलेल्या जख्मी कुत्र्याची मला दया आली..
4 घरात कचरा करून राधाने आईंचा स्वच्छता मोहिमेचा बेत उधळून लावला.
5 हल्लीच्या काळात सदाचारांचा दर्जा घसरला आहे .

**प्र 6 अ :– (अ) एका वाक्यात उत्तरे लिहाः– ( कोणतेही चार ) (4X1=4)**

1 देशाच्या मातीवर कोणाचा अधिकार आहे ?
2 चातक पक्षी कोणाची विनवणी करतो?
3 संतवाणी या अभंगाचे संपादक कोण आहेत?
4 धरणीवर पक्षीण केव्हा झेपावते?
5 भाकरीला चंद्राची उपमा कोणत्या कवीने दिली आहे ?

**प्र 6 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :–(कोणतेही चार) (4X1=4)**

1 जीव ------ तरी जीव किती हा लहान.
2 नव्या पिढीचा नव्या -------  स्वप्न करू साकार.
3 दुनियेचा विचार हरघडी केला अगा ------ झालो.
4 अशा असंख्य ज्योतीचे तुइयामागून राखन  ------- असे तुला एकच औक्षण.
5 हजार आम्ही एकी ------- सर्वांचे हो एकच मनगट.

**प्र 6 क) खालील काव्यपंक्तींचे संदर्भासहित स्पष्टीकरण कराः–(कोणतेही एक) (1X3=3)**

1 भुकेलें वत्सरावे ।
धेनु हुंबरत धांवे।।
वनवा लागलासे वनीं।
पाडस चिंतीत हरणी ।।

किंवा

फुलामुलांतून हसतो श्रावण
मातीचे हो मंगल तनमन
चैतन्याचे फिरे सुदर्शन
शेतामधुनी पिकवू मोती,धन हे अपरंपार।।

**प्र 7 अ स्थूलवाचन :– एका वाक्यात उत्तरे लिहा :– ( कोणतेही तीन ) (3X1=3)**

1 अरबी भाषेत अत्तर शब्दाला काय म्हणतात?
2 भारतात अनुसंशोधनाचा पाया कोणी घातला.?
3 दार हा कोणत्या भाषेचा प्रत्यय आहे ?

**प्र 7 (ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर 40ते 50 शब्दात लिहा :– (1X2=2)**

1 मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागची कारणे कोणती असावीत,असे तुम्हांला वाटते?
2 व्युत्पत्ती कोश म्हणजे काय ते लिहा ?

## विभाग– ड लेखन– (गुण 15)
## लेखन

**प्र 8 अ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा :–** **(1X6=6)**

**1 पावसाळयातील एक दिवस**

मुद्देः–निसर्गदृश्य –––– सर्वांसाठी उत्साहाचा दिन––आनंददायी वातावरण –– अविस्मरणीय दिवस.

**2 युग संगणकाचे**

**मु**द्दे :– काळाची गरज ––– महत्त्व ––––फायदे ––– तोटे ––– सदुपयोग.

**3 फाटक्या पुस्तकाचे आत्मकथन**

मुद्दे :– पूर्वी असलेले महत्त्व ––– उपयोग––– वैशिष्टये –––आजची स्थिती––––––.खंत

**प्र 8 (ब) मुद्दयावर आधारित गोष्ट लिहा. (शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक)** **(1X5=5)**

एक व्यावारी ––– त्याची अंगठी चोरीला जाते–––– नोकरांवर संशय–––– व्यापारी न्यायाधीशाकडे जातो –––न्यायाधीश युक्ती करतो –––– मंतरलेल्या काठया –––चोर सापडतो –––तात्पर्य .

किंवा

एक मोठे सरोवर––– सारे जलचर आनंदाने राहणे–––– एक मोठया माशाचे नव्याने आगमन––– छोटया माशांना खाऊन टाकणे ––– एक दिवस सर्व माश्यांची एकजूट–––मोठया माश्यावर तुटून पडणे––– मोठया माश्याची माफी ––– लहानांची एकी –––तात्पर्य.

**प्र 8 (क) पत्र लेखन :– ( कोणतेही एक )** **(1X4=4)**

तुम्ही विना/विनय पवार नेहरू मार्ग,मंगळवार पेठ,पुणे–404430,रहिवाशी आहात.तुमच्या भागातील वाढत्या कुत्र्यांचा त्रास रोखण्यासाठी पुणे महानगर पालिकेस पत्र लिहाः–

**किंवा**

वनिता/विनय पाटील, विदयानिकेतन विदयालय,कोल्हापूर येथून शाळेच्या ग्रंथालयासाठी पुस्तके मागविणारे पत्र लक्ष्मी पुस्तक भंडारास लिहा :–

**:::::::::::::::::::::: समाप्त :::::::::::::::::::::::::::**